**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. ५०/२००९/१५.०१.२०१०**

| | | |
|---|---|---|
| **श्री. .शांताराम सखाराम कुडाळकर.**<br>**२७७४, ए-वार्ड, माऊली वरुणातिर्थ ,**<br>**कोल्हापुर - ४१६०१२** | } | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| **कार्यकारी अभियंता 'महावितरण'**<br>**विभागीय कार्यालय,**<br>**कुडाल** | } | **विरुध्द पक्षकार** |

| | | |
|---|---|---|
| **फोरम उपस्थिती** | } | **१) श्री. डी. एस्. जामखेडकर**<br>**अध्यक्ष**<br><br>**२) श्री. एस्. एस्. तायडे**<br>**कार्यकारी अभियंता व सचिव** |

| | | |
|---|---|---|
| | | **प्रतिनिधी** |
| **ग्राहकाच्या वतीने** | } | **श्री. .रमेश पांडुरंग आंबर्डेकर** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | } | **श्री. पंडित बाबुलाल पवार.**<br>**उप कार्यकारी अभियंता,**<br>**विभागीय कार्यालय, कुडाळ.** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

तक्रारदार ग्राहक श्री.शांताराम सखाराम कुडाळकर. पत्ता -२७७४, ए-वार्ड, माऊली वरुणातिर्थ , कोल्हापुर - ४१६०१२.यांनी ॲक्शन मध्ये मुंबई डेब्ट रिकव्हरी ट्रिब्युनल क्र.१ यांच्याकडुन डब्ल्यु.जी.फोर्ज आणि अलाइड इंडस्ट्रीजच्या नावे असलेला प्लॉट क्र.१-अ (१-A) खरेदी केला आहे व त्यासाठी तात्पुरता विद्युत पुरवठयाची मागणी महावितरण कुडाल विभाग येथे केलेली असता, कार्यकारी अभियंता कुडाळ विभाग यांनी पत्र क्र.७०९ दि.१२/१२/२००८ द्वारे सदर प्लॉट वर लघुदाब व उच्चदाब विदयुत पुरवठयाची थकबाकी वसूल झाल्यानंतर नवीन विदयुत पुरवठा करता येईल असे तक्रारदार ग्राहकास कळविले आहे. या विरुध्द तक्रारदार ग्राहक यांनी १५/१०/२०१० रोजी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सिधुदुर्ग यांच्या कडे तक्रार दाखल करण्यात आलेली होती. सदर तक्रार दोन महिन्याचा कालावधी नंतर सुध्दा निकाल न मिळाल्याने ग्राहकांनी ग्राहक तक्रार निवारण मंच, रत्नागिरी येथे दि.१३/०१/२०१० रोजी तक्रार दाखल केलेली आहे. सदरहु तक्रार आयोगाच्या नियमावली नुसार मंचाकडे दाखल करण्यात आलेली आहे.

तक्रार दि.१३/०१/२०१० रोजी दाखल होताच मंचाकडील पत्र क्र.६११ दि.१५/०१/२०१० च्या पत्रानुसार कार्यकारी अभियंता विभागिय कार्यालय कुडाल यांच्या कडुन प्रकरणाविषयी स्पष्टीकरण मागण्यात आले, परंतु विभागीय कार्यालय कुडाळ यांच्याकडुन विहित कालावधीत स्पष्टीकरण न आल्याने, सदरहु प्रकरणाची दि.०२/०२/२०१० रोजी नोटीस काढण्यात येऊन दि.१८/०२/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणी कालावधीत तक्रारदार ग्राहक आणि महावितरणच्या वतीने उपस्थित राहून उभयबाजुंनी युक्तीवाद करण्यात आला.

ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरुप असे की,ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरुप असे की , मे. डब्ल्यु.जी.फोर्ज आणि अलाइड इंडस्ट्रीज, कुडाळ यांचे नावे उच्चदाब कनेक्शन आहे त्यांचा ग्राहक क्रं.५०२०४ आहे व ग्राहकाकडे थकबाकी ३४.६० लाख रु आहे. सदर ग्राहकाचा विद्युत पुरवठा थकबाकी न भरल्यामुळे खंडीत करण्यात आलेला होता. श्री.शांताराम सखाराम कुडाळकर यांनी तीन प्लॉट पैकी प्लॉट १-अ ,MUMBAI DEBITS RECOVERY TRIBUNAL NO.I यांच्याकडून लिलावात दि.१५/१२/२००६ रोजी खरेदी केला होता व त्यांचा ताबा त्यांना १७/०१/२००७ रोजी मिळाला.

या प्रकरणाची सुनावणी दि.१८/०२/२०१० रोजी घेण्यात आली असता ग्राहकाच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री.रमेश पांडुरंग आंबर्डेकर हे उपस्थित राहुन आपला युक्तीवाद केला. महावितरणच्या वतीने उपकार्यकारी अभियंता श्रीयुत पवार यांनी उपस्थित राहुन आपला युक्तीवाद केला. ग्राहकाच्या वतीने श्रीयुत आंबर्डेकर यांनी आपल्या युक्तीवादात स्पष्ट केले की कोर्ट ऑफ रिसीव्हर कडुन प्लॉट क्र.१-ए ऑक्शन मध्ये खरेदी केलेला आहे. तक्रारदार ग्राहकाने म.रा.वि.वि.कं.मर्या. यांचे पत्रक PR-३/Tariff/२१३७८ दि.०७/०५/२००७ वाणीज्य परिपत्रक क्र.५३ नुसार थकबाकी वसुली करण्यात यावी याची मागणी केलेली आहे. सदर जागेवर असलेल्या निवासी विदयुत पुरवठयाची ६ महिन्याची थकबाकी भरण्यास तयार आहे. विदयुत पुरवठा देण्यास महावितरणने फार विलंब केल्यामुळे दंड लावण्यात यावा. महावितरणच्या वतीने उपकार्यकारी अभियंता श्रीयुत पवार यांनी लेखी कागदपत्रे सादर केली.

या तक्रारप्रकरणात ग्राहकाच्या बाजुने दाखल झालेला तपशील व युक्तीवाद व अन्य अनुषंगीक बाबी तपासता प्लॉट क्र.१ व १-अ वर उच्च विदयुत पुरवठयाची थकबाकी आहे असे मंचाचे स्पष्ट मत आहे. लघुदाब विद्युत पुरवठा विषयी कोणतेही कागदपत्रे अर्जदार अगर सामनेवाला यांनी मंचास दाखल केलेले नाही. महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग ( विदयुत पुरवठा कोड आणि इतर पुरवठा तरतुदी ) नियमन -२००५ च्या १०.५ नुसार एखादया जागेवर असलेली विदयुत पुरवठयाची थकबाकी फक्त शेवटच्या सहा महीन्याची थकबाकी विदयुत पुरवठा कंपनीला वसुल करता येते. त्यानुसार सदर प्लॉट क्र.१ व १-अ असलेली उच्च दाबाची विद्युत पुरवठयाची थकबाकी फक्त शेवटच्या सहा महीन्याची ग्राहकाकडून महावितरणला वसुल करता येईल.

# आदेश

१. **प्लॉट क्र.१ व १-अ वर असलेली उच्च दाबाची विद्युत पुरवठयाची थकबाकी पैकी फक्त मागील सहा महिन्यापासुनची थकबाकी महावितरणने ग्राहकाकडून वसूल करण्यात यावी व वसुलीनंतर ३० दिवसात तक्रारदार ग्राहक यांना मागणी केलेलीा तात्पुरता विद्युत पुरवठा जोडण्यात यावी.**

२. **आदेश क्र.१ च्या कार्यवाहीस ३० दिवसापेक्षा विलंब झाल्यास पुढील प्रत्येक दिवसाला रु.१०० या प्रमाणे ग्राहकास भरपाई देणे महावितरणवर बंधनकारक राहील. भरपाई देण्यास कसुर झाल्यास पुढील दंडात्मक कारवाईस महावितरण पात्र ठरेल. विहित कालावधीत कार्यवाही करुन पुर्तता अहवाल १५ दिवसात मंचाकडे दाखल करण्यात यावा.**

३. **या आदेशविरुध्द ग्राहकास अपील करावयाचे असल्यास खालील पत्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात दाखल करता येईल.**

**पत्ता :-**

**सचिव,**
**लोकपाल महाराष्ट्र राज्य**
**विदयुत नियमक आयोग**
**६०६/६०८ केशवा बिल्डींग/**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मुबंई ४०००५१**
**फोन नं. ०२२ / २६५९२९६५**

**श्री. एस्. एस्. तायडे**
**कार्यकारी अभियंता**
**व सचिव**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोकण परिमंडल रत्नागिरी**

**श्री. डी. एस्. जामखेडकर**
**अध्यक्ष**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोकण परिमंडल रत्नागिरी**

**दिनांकः- १०.०३.२०१०**
**ठिकाणः- रत्नागिरी.**